# कृषि पर्यटकांना खुशखबर

सर्व पर्यटकांना कळविण्यास आनंद होत आहे की, वाकवली प्रक्षेत्रावर कोकण कृषि पर्यटन सहल आरक्षण सुरु झाले आहे.
येणाऱ्या सर्व पर्यटकांचे वाकवली प्रक्षेत्रावर स्वागत

| | | |
|---|---|---|
| सहलीची वेळ | : | सोमवार ते शुक्रवार (१०:०० ते १२:००) |
| स्वागत मुल्य | : | रु. १००/— प्रती पर्यटक |
| विद्यार्थीसाठी खास सवलत | : | रु. २५/— प्रति विद्यार्थी पर्यटक |
| सहलीसाठी पर्यटन स्थळे | : | भाजीपाला पिके/कंदपिके/उष्ण कटीबंधिय पिके/रोपवाटीका/गांडुळ खत प्रकल्प/ भाजीपाला बिजोत्पादन/शेततळी मत्स्य शेती/पांगारी आंबा/चंदन लागवड (कृषि वनिकी) |
| आरक्षणासाठी भ्रमणध्वनी क्र. | : | १. डॉ. बी. जी. देसाई : ९४२२३९१४०९ |
| | | २.डॉ. एस.जी.महाडिक : ९४२११३५७६४ |
| | | ३.डॉ. आर.पी.महाडीक : ९४२३८७४४२७ |
| | | ४.श्री. एस.जी. शिगवण : ९६६५४०४०१९ |

आरक्षण संदेश देवून पर्यटकांचे स्वागत करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| नोंदणीसाठी बँकेचे नाव | : | रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक, शाखा वाकवली |
| खातेदाराचे नाव | : | डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली |
| खाते क्रमांक | : | ११०८१०१०२०००१, आयएफसी कोड : IBKL0574RDC |

# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
# मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली

# कोकण कृषि पर्यटन सहल
## सहलीची नियमावली

१. कोकण कृषि पर्यटन सहल मध्यवर्ती संशोधन केंद्राच्या विभाग प्रक्षेत्रावर मर्यादित राहील. सहलीची सुरुवात मध्यवर्ती संशोधन केंद्राच्या विक्री केंद्रापासून होईल. त्यानंतर वाकवली विभाग, पांगारी शेततळे, पांगारी आंबा आणि टेटवली चंदन लागवड यांचा समावेश पहिल्या टप्प्यामध्ये करण्यात येईल. दुसऱ्या टप्प्यामध्ये टेटवली बंधारा, असोंड विभाग, गावतळे विभाग, रुखी रबर लागवड, जल व्यवस्थापन प्रात्यक्षिके, रुखी विभाग असे राहील.

२. सहलीचे आयोजन सोमवार ते शुक्रवार या दिवशी १०:०० ते १२:०० या वेळेत आखण्यात आले आहे. कोकण कृषि पर्यटन सहलीसाठी आगावू नोंदणी आवश्यक आहे.

३. सहलीस इच्छूक असणाऱ्या पर्यटक/शेतकरी यांनी ०९:३० वाजता विक्री केंद्र येथे प्रत्यक्ष येऊन सहलीचे शुल्क भरुन नोंदणी करावी. सहलीचे शुल्क रु. १००/— प्रति व्यक्ती व रु. २५/— प्रति विद्यार्थी राहील. शुल्काची रितसर पावती असणाऱ्या पर्यटकांनाच सहलीची परवानगी राहील.

४. सहलीच्या आयोजनासाठी विद्यापीठाची अधिकृत मिनीबस/छोटे वाहन याची गरजेनुसार नियोजन करण्यात येईल. सदर वाहन नादुरुस्त असल्यास अथवा अधिकृत वाहन चालक गैरहजर असल्यास अथवा इतर कोणतीही अडचण असल्यास आगाऊ मोबाईल संदेशाव्दारे कळविण्यात येईल.

५. सहलीला येणाऱ्या पर्यटकांना स्वागत/आदराप्रित्यर्थ थंड पेय, माहितीपुस्तिका, दिशादर्शक पुस्तिका उपलब्ध करण्यात येईल.

६. सहलीस येणाऱ्या पर्यटकांनी प्रक्षेत्रावर मद्यपान/धूम्रपान करु नये, तसेच सहलीच्या वेळी वाहनामध्ये हुल्लडबाजी अथवा बेशिस्त वर्तन केल्यास सहल तात्काळ स्थगित करण्यात येईल व त्यांचे सहलीचे मूल्य परत देण्यात येणार नाही.

७. प्रक्षेत्रावरील कोणत्याही झाडाची पाने/फांद्या/फुले/फळे/माहिती फलक इत्यादीला हात लावण्यास अथवा तोडण्यास पूर्ण मनाई आहे.

८. प्रत्येक कृषि पर्यटकाने आपल्यासोबत आणलेल्या सामानाची जबाबदारी स्वत:ची राहील, सामान हरविल्यास विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहणार नाही.

९. सहलीसोबत मार्गदर्शकाची (Guide) सोय करण्यात आलेली आहे. त्याचे स्वतंत्र शुल्क आकारण्यात येणार नाही.

१०. मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवलीच्या प्रत्येक सहल स्थळावर पिण्याच्या स्वच्छ पाण्याची सोय विद्यापीठातर्फे करण्यात येईल.

११. मध्यवर्ती संशोधन केंद्राच्या वाकवली प्रक्षेत्रावर उत्पादित होणाऱ्या कृषि उत्पादनाची पर्यटकांसाठी सशुल्क खरेदी व्यवस्था विक्री केंद्रावर रास्त दरात करण्यात आलेली आहे.

१२. सहलीसाठी येणाऱ्या पर्यटकांनी संबंधित कर्मचारी अथवा मार्गदर्शक यांच्याशी योग्य ते सहकार्य करण्याची विनंती आहे.

१३. कोकण कृषि पर्यटन सहलीच्या संदर्भातील सर्व अधिकार संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली यांच्याकडे राखून ठेवलेले आहेत.

*******